प्रेसनोट दि.२९/०८/२०१७

**मुलगी असल्याचे भासवून सोशल मिडीयाव्दारे अश्लिल चॅटींग करून ब्लॅकमेल करणारा तरूण सायबर क्राईम सेलच्या जाळ्यात.**

सोशल नेटवर्कींग वेबसाईट व्दारे अनेक तरुण मुले व मुलींशी जवळीक साधून त्यांना जाळ्यात ओढून व्हिडीओ कॉलींगव्दारे व्हिडीओ रेकॉर्डीग करून ते व्हिडीओ इंटरनेट व्हायरल करण्याची धमकी देवून ब्लॅकमिलींग करण्याचे व पैसे उकडण्याच्या प्रकारामध्ये वाढ होत आहे. दाखल गुन्ह्यातील फिर्यादी यांना अज्ञात व्यक्तीने फेसबुक किंवा पेपरनिटी या सोशल नेटवर्कींग वेबसाईटवर मुलीच्या नावाने बनावट प्रोफाईल तयार करून त्यांच्याशी जवळीक साधली. त्यांनतर त्यांचा अश्लिल व्हिडीओ मोबाईलवर तयार करून सोशल मिडीया वेबसाईट अथवा ॲप्लिकेशनव्दारे रेकॉर्डीग करून केला. सदर व्हिडीओ सोशल मिडीया वेबसाईटवर अपलोड न करण्यासाठी पैश्यांची मागणी करून त्यांना पैसे जमा करण्यास अनेकांना भाग पाडले. फिर्यादी यांना ब्लॅकमेल करून त्यांची आर्थिक फसवणूक केली असल्याने बंडगार्डन पोलीस ठाणे गु.रं.नं. ३०४/२०१७, भा.द.वि. कलम २०१, ४१९, ४२०, ४८४, ४८५ सह माहिती तंत्रज्ञान सुधारित कायदा २००८ चे कलम ६६ सी, ६६ डी, ६७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आहे.

यातील फिर्यादी यांनी मा. पोलीस उप आयुक्त सायबर सेल यांना ईमेलव्दारे तक्रार केली होती त्यांच्या मागदर्शनाखाली दाखल गुन्ह्याचा समांतर तपास हा सौ. मनिषा झेंडे, पोलीस निरीक्षक, सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा करीत आहेत. सायबर सेलच्या पथकाने त्वरीत संबधित कंपन्यांकडून माहिती प्राप्त करून आरोपी नामे सुहित यशवंत जाधव, रा- के-१०१, सारंग सोसायटी, नांदेड सिटी, सिंहगड रोड, पुणे ४११०४१ यास निष्पन्न करून त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडुन ३ मोबाईल, ०१ लॅपटॉप, ०२ डेबीट कार्ड व २४,०००/- रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. सदर आरोपी यास ताब्यात घेवून पुढील कारवाईसाठी बंडगार्डन पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. त्याचेकडे करण्यात तपासामध्ये ३० -४० लोकांना अशा प्रकारे ब्लॅकमेल करून आर्थिक फसवणूक केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई ही श्री. सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, सायबर सेल, मार्गदर्शन खाली पो.नि. सौ. मनिषा झेंडे, सपोनि सचिन गवते, पोलीस कर्मचारी- किरण अब्दागिरे, नवनाथ जाधव, शिरीष गावडे, दिपक माने यांच्या पथकाने केली आहे.

याद्वारे पुणे शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा अनोळखी व्यक्ती, मोबाईल नंबर अशा प्रकारे सोशल नेटवर्कींग वेबसाईट अथवा ॲप्लिकेशनव्दारे खात्री केल्याशिवाय स्वतःची वैयक्तिक माहिती देवू नये तसेच व्हिडीओ कॉलींग करताना योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच असा कोणताही प्रकार लक्षात आल्यास जवळचे पोलीस स्टेशनशी अथवा सायबर क्राईम सेल विभागाशी संपर्क साधावा.